आधुनिक विचारांचे
# वर्तमान
बीड । मंगळवार, १५ जून २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : ३४ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## आजपासून ऑनलाईन शाळा सुरू



मुंबई : कोरोना आरोग्य संकटाच्या पार्श्वभूमीवर सलग दुसऱ्या वर्षी राज्यातील शाळा आजपासून ऑनलाईन माध्यमातूनच सुरू होणार आहेत. राज्यातील शाळांचे शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू होणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली. प्रत्यक्षात शाळा सुरू करण्याबाबत मात्र अद्याप राज्य सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. राज्यातील कोरोनाची रूग्णसंख्या कमी झाली असली तरी आजही अनेक जिल्ह्यांत कडक लॉकडॉऊन लागू करण्यात आले आहे. त्यामुळे सध्या तरी राज्यातील शाळा सुरू होण्याची शक्यता कमी आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# भेटी लागे जीवा...!

## यंदाही १० पालख्या बसनेच जाणार; शासनाने जारी केला आदेश



प्रतिनिधी

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही आषाढी वारीसाठी परवानगी दिलेल्या पालख्या या बसनेच नेण्यात येणार आहेत. राज्य शासनाने याबाबत आदेश नुकताच जारी केला आहे. या आदेशानुसार गतवर्षीप्रमाणेच वारीचे स्वरुप असणार आहे. प्रातिनिधिक स्वरूपात वाखरी ते पंढरपूर दरम्यानचे दीड किलोमीटर अंतरच पायीवारी होणार आहे.

यंदाची आषाढी वारी पायी चालत करण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी वारकरी, देवस्थान आणि महाराज मंडळींकडून करण्यात येत होती. मात्र, कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता महाविकास आघाडी सरकारने यंदाही एसटी बसने पालख्या पंढरपूरला घेऊन जाण्याची परवानगी दिली आहे. शासनाने वारीसाठी काढलेल्या सुधारित नियमावलीनुसार मानाच्या दहा पालख्यांनाच या वारी प्रस्थान सोहळ्यात सहभागी होता येणार आहे. त्यासाठी यावर्षी देहू आणि आळंदी येथील प्रस्थान सोहळ्यासाठी प्रत्येकी १०० व उर्वरीत आठ सोहळ्यांसाठी प्रत्येकी ५० वारकऱ्यांना सहभागी होता येणार आहे.

या पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या पालखी किंवा दिंड्यांना प्रातिनिधीक स्वरूपात प्रस्थान सोहळ्याव्दारे आषाढीवारीमध्ये सहभागी होण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रस्थान ठिकाणापासून विशेष वाहनाद्वारे वाखरी येथे पोहोचल्यानंतर तिथून पंढरपूरकडे दीड किमी प्रातिनिधीक स्वरूपात पायीवारी करता येणार आहे. यावर्षी सर्व मानाच्या पालखी सोहळ्यांचे पंढरपूरमध्ये दशमीच्या दिवशी आगमन होऊन पौर्णिमेच्या दिवशी प्रस्थान करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मानाच्या दहा पालख्यांना वारीला जाण्यासाठी २० बसेस दिल्या जाणार आहेत. पालखीसोबत जाणाऱ्या सर्वांची आरटीपीसीआर चाचणी करण्यात येणार आहे. सर्व पालख्यांना कोरोना नियम पालन करण्याचे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### सोहळ्याबाबत झालेला निर्णय

देहू, आळंदीसह राज्यातील १० मानाच्या पालख्यांनाच परवानगी.

देहू-आळंदी येथील पालखी प्रस्थान सोहळ्यास प्रत्येकी शंभर लोकांचीच उपस्थिती.

एका पालखीसोबत दोन एसटी बस व ३०-३० वारकरी, भाविक जाऊ शकतात.

यंदादेखील पायी पालखी सोहळा, वारीला परवानगी नाही.

### या आहेत मानाच्या १० पालख्या



संत ज्ञानेश्वर महाराज (आळंदी), संत तुकाराम महाराज (देहू), संत निवृत्ती महाराज (त्र्यंबकेश्वर), संत सोपानकाका महाराज (सासवड), संत मुक्ताबाई (मुक्ताईनगर), संत नामदेव महाराज (पंढरपूर), संत एकनाथ महाराज (पैठण), रुक्मिणीमाता (कौंडण्यपूर-अमरावती), संत निळोबाराय (पिंपळनेर-पारनेर अहमदनगर) संत चांगावटेश्वर महाराज (सासवड).

# डॉ.प्रितम मुंडे यांना केंद्रात मंत्रिपद?



## बीड जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर संधी मिळण्याची शक्यता

प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात केंद्रबिंदू ठरलेल्या बीड जिल्ह्याचे केंद्रीय स्थानी अनन्यसाधारण महत्व प्राप्त करून देणारे दिवंगत गोपिनाथराव मुंडे यांच्या नंतर बीड जिल्ह्याला केंद्रात मंत्रिपद मिळेल का? यावर चर्चा होत असताना खासदार डॉ.प्रितम मुंडे यांची केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे.

प्रितम मुंडे यांना मंत्रिपद मिळाले तर गेल्या सात दशकात केंद्रामध्ये मंत्री पद मिळवण्याचा चौथा मान डॉ.प्रितम मुंडे यांच्याकडे जाईल. केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याने या मंत्रिमंडळात नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात येणार असल्याचे बोलले जाते.केंद्रीयस्तरावर दिवंगत गोपीनाथ मुंडे, दिवंगत प्रमोद महाजन यांच्या कार्यकाळात जिल्ह्याचा दबदबा कायम होता. गेल्या सात दशकामध्ये केवळ तीन लोकांना स्थान मिळाले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### बायो मॅग्नेशियममुळे चिकटू शरीराला शकतात धातूच्या वस्तू

सोलापूर : माणसाच्या शरीरात चुंबकीय बल तयार होते. त्याला बायोमॅग्नेशियम असे म्हणतात. शरीरात मॅग्नेशियम फील्ड हे मेंदू, फुफ्फुस आणि हृदयापासून तयार होते. तसेच हिमोग्लोबिनमध्ये लोह असते. याचे प्रमाण कमी-अधिक झाल्यास वस्तू अंगाला चिकटू शकतात, असे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ.विकास पाटील यांनी सांगितले. शरीरातील काही पदार्थांचे प्रमाण कमी किंवा अधिक झाल्याने असे होऊ शकते. त्यामुळे लसीकरण आणि अंगाला चमचा, नाणी चिकटणे याचा काहीही संबंध नाही असेही त्यांनी सांगितले. नागरिकांनीही सोशल मीडियावर अशा बाबी शेअर करू नये तसेच कोरोनापासून बचावासाठी अधिकाधिक नागरिकांनी लस घ्यावी, असे आवाहन डॉ.पाटील यांनी केले.

### ऑनलाईन सोडत बियाण्यांपासून शेतकरी वंचित

माजलगाव : शेतात पेरण्यासाठी सोयाबीन व तुरीचे बियाणे शासकीय अनुदानात मिळावे म्हणून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्याची सोडत काढण्यात आली. मात्र लॉटरी पध्दतीने मिळालेले बियाणे शेतकऱ्यांना परमिट मिळूनही देण्याबाबत व्यापाऱ्यांकडून टाळाटाळ केली जात आहे. अशा व्यापाऱ्यांना कृषी अधिकारी पाठीशी घालत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनुदानित बियाणांसाठी माजलगाव तालुक्यातील ५९१ शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर मागील महिन्यात नोंद केली होती. त्याची सोडत पुणे येथील कृषी आयुक्त कार्यालयात काढण्यात आली. या सोडतीमध्ये सोयाबीन बियाणांसाठी २०२, तर तूर बियाणांसाठी १६८ शेतकरी निवडले गेले आहेत.

### धारूरमध्ये बी-बियाण्यांची कृत्रिम टंचाई

धारूर : शहरामध्ये खते, बियाणे यांची चढ्या भावाने विक्री सुरू आहे. सोयाबीनच्या बॅगांची तर कृत्रिम टंचाई करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू आहे या सर्व प्रकाराकडे कृषी अधिकाऱ्यांची मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे. यावर्षी धारूर तालुक्यात सर्वत्र चांगला पाऊस होत असल्याने धारूरच्या बाजारात शेतकऱ्यांनी खते व बियाणे खरेदीसाठी गर्दी केली आहे याचाच फायदा काही कृषी दुकानदार घेताना दिसत आहे. खते व बियाण्यांची चढ्या भावाने विक्री करून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक गंडा लावला जात आहे. तसेच सोयाबीनचे बॅग उपलब्ध नसल्याचे सांगून जास्तीचे पैसे दिल्या बरोबर उपलब्ध करून दिल्या जातात सोयाबीन बॅगची कृत्रिम टंचाई करून चढ्या भावाने विक्री धारूरच्या बाजारात सुरू आहे. शेतकऱ्यांचे महत्त्वाच्या प्रश्नाकडे कृषी कार्यालयाचे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे कृषी अधिकाऱ्यांचे याविषयी कुठलीही नियोजन दिसून येत नाही. चढ्या भावाने विक्री होत असेल तर अशा कृषी दुकानांवर कृषी अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे. लॉकडॉऊनमुळे अगोदरच दोन महिन्यापासून शेतकरी हैराण आहे. बळीराजा बेजार झालेली आहे.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !



## संपादकीय

# आदर्श संस्कृतीचा ज्येष्ठ मास

भारतीय संस्कृतीत प्रत्येक मासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदू कालगणनेतल्या प्रत्येक मासाचे महत्त्व वेगळे आहे. प्रत्येक महिना अनेकविध सणांनी, व्रतवैकल्यांनी नटलेला असतो. ऋतूचक्रानुसार प्रत्येक महिन्याचे काही नियम ठरवण्यात आले आहेत. या नियमांनुसार आपण दिनचर्येत, आहार–विहाराच्या सवयीत बदल करणे अपेक्षित असते. चैत्रात वृक्षवल्लींना नवी पालवी फुटू लागते. हा बहराचा काळ असतो. वैशाखात सूर्य आग ओकत असतो. वैशाख संपू लागला की, ज्येष्ठाचे वेध लागायला सुरुवात होते. ज्येष्ठ म्हणजे मोठा. ज्येष्ठाचा स्वामी मंगळ. ज्येष्ठ सुरू झाल्यावर पावसाची चाहुल लागते. ज्येष्ठ महिना वैशाखातल्या उन्हाळ्याने पोळलेल्या धरणीमातेला बरसत्या जलधारांनी चिंब करतो. आकाशात काळ्या ढगांची दाटी होऊ लागते, जलधारा बरसू लागतात. संपूर्ण चराचरात एक वेगळाच उत्साह संचारतो. हिरवाईने नटलेली ही सृष्टी निसर्गाचं एक वेगळंच रूप दाखवत असते. याच काळात शाळा सुरू होत असतात. शेतकरी राजा पेरण्यांच्या कामाला लागतो, तर महिलावर्ग वटसावित्रीसह अन्य सण उत्सवांच्या तयारीला लागतो. ज्येष्ठ येत्या काळातल्या सुखाची, आनंदाची वर्दी घेऊन येत असतो. म्हणूनच ज्येष्ठ मांगल्याचे प्रतीक ठरतो. ज्येष्ठ शुद्ध प्रथमेपासून गंगादशहऱ्याला प्रारंभ होतो. दशमीपर्यंतचा हा काळ दानाचे, त्यागाचे, महत्त्व अधोरेखित करत असतो. आपल्या संस्कृतीत दानधर्माला सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. दानधर्मासाठी काही मुहूर्तही योजण्यात आले आहेत. ज्येष्ठ महिन्यात गंगादशहरा'च्या निमित्ताने गुरुजींना बोलावून दहा आंब्यांचे दान द्यावे, असे सांगितले आहे. आंबा म्हणजे फळांचा राजा. त्याच्या मधुर रसाने तहान आणि भूक दोन्हीही भागते आणि रसनेबरोबर मनही तृप्त होते. गुरुजी म्हणजे देवाची सेवा करणारा, पावित्र्याची जोपासना करणारा, ज्ञानाची पूजा करणारा आणि एकव्रती अशी कल्पना आहे. आपल्या संस्कृतीत पावित्र्य, सेवाभाव, ज्ञानोपासना, ईश्वरभक्ती या बाबींना नेहमीच अपरिमित महत्त्व देण्यात आले आहे. हे दान दिल्यामुळे घरातले धन वाढते अशी भावना दृढ आहे. यानिमित्ताने हातून सतशील व्यक्तींची सेवाही घडते. ज्येष्ठात तिळाच्या दानाला मोठे महत्त्व आहे. तिळाच्या दानाने विष्णू प्रसन्न होऊन आयुरारोग्य वाढत असल्याचं शास्त्र सांगते. महाभारतातल्या अनुशासन पर्वात ज्येष्ठाची महती वर्णन करणारा ज्येष्ठामूलं तु यो मासमेकंभकक्तेन ऐश्वर्यतुलं श्रेष्ठं पुमान्स्त्री वा प्रपद्यते' असा श्लोक आहे. ज्येष्ठ महिन्यात एक वेळा भोजन करणाऱ्या व्यक्तीला ऐश्वर्याची प्राप्ती होते, असा याचा अर्थ. आयुर्वेदानुसार ऋतुबदलाच्या या काळात पचनसंस्थेशी संबंधित आजार डोके वर काढण्याच्या शक्यतेमुळे एक वेळ भोजन करण्यास सांगण्यात आले आहे. ज्येष्ठ महिन्यात जलदानाचे महत्त्व असते. तहानलेल्या जीवाला पाणी पाजल्याने अपार पुण्य मिळते. यासोबतच वृक्षांना, वेलींना वेळेवर पाणी घालायला हवे. तसेच ज्येष्ठात पाण्याचा अपव्यय निषिद्ध मानण्यात आला आहे. पाणी म्हणजे जीवन. पाण्याशिवाय आपण जगू शकत नाही. म्हणूनच पाण्याचा जपून वापर करण्यासोबतच ते साठवायला हवे, असाच संदेश हा ज्येष्ठ महिना देऊन जातो. ज्येष्ठाच्या प्रारंभासोबतच महिलांना वटपौर्णिमेचे वेध लागतात. ज्येष्ठ पौर्णिमा म्हणजेच वटपौर्णिमा. साक्षात यमराजाबरोबर बुद्धिकौशल्याने संवाद साधून पातिव्रत्याच्या बळावर पतीचे प्राण परत आणणारी सावित्री ही आजही प्रत्येक स्त्रीचा आदर्श असते. खरे तर, वड हा अनेक अर्थांनी मानवाला आणि पर्यावरणाला उपयुक्त असा वृक्ष. वडामुळे प्राणवायू मुबलक प्रमाणात उपलब्ध होतो. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत प्राणवायूचं महत्त्व अधोरेखित झाले. वातावरणात मुबलक प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या प्राणवायूचे आपल्याला फारसे महत्त्व नसते. मात्र अशा आजारपणाच्या काळात वड, पिंपळासारखे प्राणवायू वातावरणात सोडणारे वृक्ष आठवतात. काळ बदलला तसा स्त्रीशिक्षणाचा मार्ग खुला झाला, स्त्रियांनी शिक्षण घेतले. त्या नोकरी करू लागल्या. मात्र त्यांच्या जबाबदाऱ्या कमी झाल्या नाहीत, तसेच त्यांची भूमिकाही बदलली नाही. नोकरी आणि घराची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारी, पतीच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी, कुटुंबाचा गाडा हाकण्यात साथ देणारी आजची स्त्री म्हणजे मूर्तिमंत सावित्रीच. तिच्या मनातले पतीप्रेम, निष्ठेची भावना ही पुराणकाळातल्या सावित्रीच्या मनातल्या भावनेसारखीच असते. आज अशा असंख्य महिला तेजाने तळपताना दिसतात. आधुनिक काळातल्या महिला कौटुंबिकच नाही, तर देशाची जबाबदारी अंगावर घ्यायलाही मागे–पुढे बघत नाहीत. देशाच्या संरक्षण दलांमध्ये महिला मोठ्या हिरीरीने सहभागी होत आहेत. देशाच्या रक्षणासाठी सीमांवर शस्त्रसज्ज होऊन शत्रूला आव्हान देत आहेत. सैन्यात पतीने देशासाठी बलिदान दिल्यानंतर अश्रू न ढाळता त्याच्या जागी दाखल होणाऱ्या वीरपत्नी म्हणजे साक्षात दुर्गेचाच अवतार. या मासातली अध्यात्मिक दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे श्रीक्षेत्र देहू येथून संत तुकारामांच्या पालखीचे प्रस्थान होते. त्याच्याच दुसऱ्या दिवशी श्रीक्षेत्र आळंदी इथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होते, तर असा हा ज्येष्ठ महिना खऱ्या अर्थाने ज्येष्ठत्व मिरवतो. आपले नाव सार्थ करतो. ज्येष्ठाचा महिमा अपरंपार आहे आणि म्हणूनच तो अनेक दृष्टींनी परिपूर्ण ठरतो, ही भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहेत.

# भारताने जगाकडून काय शिकावे ?

**लॉकडाऊनचा विचार केला तर जगभरात वेगवेगळं चित्र दिसतं. परदेशातल्या लॉकडाऊनची स्थिती आपल्यापेक्षा वेगळी आहे. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी या सारख्या विकसित देशातली जनता मुळात शिस्तप्रिय आहे. तिथंही आपल्या सारखी गजबज असते. पण त्यात एक शिस्त असल्याचं जाणवतं. आपल्याकडे मात्र 'ब्रेक द चेन'चा अर्थ कुणालाच समजलेला नाही, किंवा समजूनही आपण त्याकडे दुर्लक्ष केलंय.**

**आज-काल**
**जयंत होवाळ**

मागच्या वर्षापासून सगळ्या जगाचा गाडा थांबल्यासारखा झालाय. चुकार बैल जसा शेत नांगरताना मधेच बसकण मारतो, तसं झालंय. जरा कुठे जगाचा कारभार नेहमी प्रमाणे सुरु होतोय असं वाटत असतानाच कोरोनाच्या पहिल्या दुसऱ्या तिसऱ्या लाटा थडकू लागतात आणि जगाचं रहाटगाडगं थांबून जातं. कोरोनाने चालत्या गाड्याला असा घुणा लावलाय जणू.

लॉक–अनलॉकचा खेळ

गेल्यावर्षीपासून लॉक अनलॉकच्या फेऱ्यात सगळं जग अडकून पडलंय. प्रत्येक देशात या लॉक अनलॉकच्या नाना तऱ्हा! पण समानता एकच, की काही काळासाठी व्यवहार सगळ्या जगात ठप्प झालेत. आपल्या देशात जनता कर्फ्यूपासून या सगळ्याला सुरवात झाली. जनता कर्फ्यू नंतर देशस्तरावर लॉक अनलॉकचा खेळ सुरू झाला. मार्च २०२० पासून जवळपास जून अखेरपर्यंत लॉकडाऊन लागू होता. या काळात अनेकांचे रोजगार गेले, अनेकजण देशोधडीला लागले. कोरोनामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. हे दुष्टचक्र आजही सुरु आहे. सुरवातीला शहरी भागात कडक लॉकडाऊन होता. मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांची तर गतीच थांबली होती. लॉकडाऊनचा विचार केला, तर जगभरात चित्र वेगवेगळं दिसतं. आपल्याकडे लोकांनी लॉकडाऊन गांभीर्याने घेतल्याचं क्वचितच दिसून आलं. त्यामुळे प्रसंगी पोलिसी बळाचा वापर करण्याची वेळ आली.

परदेशात गजबज आणि शिस्तही

इतर देशातही लॉकडाऊन होता आणि आजही काही ठिकाणी आहे. परदेशातल्या लॉकडाऊनची स्थिती मात्र आपल्यापेक्षा वेगळी असल्याचं दिसून येतं. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी या सारख्या विकसित देशातली जनता मुळात शिस्तप्रिय आहे. तिथंही आपल्या सारखी गजबज असते. पण त्यात एक शिस्त असल्याचं जाणवतं. भारतातला लॉकडाऊन आणि परदेशातला लॉकडाऊन यातला फरक समजून घेण्यासाठी परदेशात स्थायिक झालेल्या काही भारतीयांशी या निमिताने संवाद साधला. स्नेहा आणि वरूण शर्मा हे कॅनडा या



देशात स्थायिक झालेलं दाम्पत्य. आपल्या सारखं तिथं मास्क वापरा, अंतर राखा असं कानी कपाळी ओरडून सांगावं लागत नाही, की जाहिराती कराव्या लागत नाहीत. प्रत्येक व्यक्ती मास्क शिवाय घराबाहेर पडत नाही. पाश्चिमात्य देशात प्रामुख्याने सुपर मार्केटमधून खरेदी होते. आपल्या सारखी टपऱ्या वजा दुकाने तिथं कमीच असतात. सुपर मार्केटमधे एका वेळी मोजक्या लोकांनाच प्रवेश दिला जातो. विशेष म्हणजे तिथं लॉकडाऊन संपला की शाळाही सुरु होतात, असं स्नेहा सांगते. कदाचित या देशांची लोकसंख्या कमी असल्यामुळे शिवाय आपल्या सारखं एका वर्गात ५० ते ६० मुलं कोंबून बसवली जात नसतील, त्यामुळे शाळा सुरू ठेवणं शक्य होत असावं.

ऑस्ट्रेलियाचा शिस्तबद्ध कारभार

सायली तांबे ही ऑस्ट्रेलियात उच्च शिक्षण घेत असलेली मुंबईची मुलगी. तिथल्या मेलबर्न शहरात ती राहते. मेलबर्न शहर हे ब्रिटानिया राज्याचा भाग आहे. त्यामुळे लॉकडाऊन लागू झाला की तो फक्त मेलबर्न मधेच नसतो तर पूर्ण ब्रिटानियात लागू होतो. तिथले लोक आरोग्याची खूप काळजी घेतात. कोरोनाची प्रचंड दहशत आहे. त्यामुळे लोक विनाकारण बाहेर पडत नाहीत, असं सायली सांगते. रेस्टॉरंटमधल्या प्रवेशासाठी कडक नियम आहेत. प्रत्येक रेस्टॉरंटच्या बाहेर 'क्यू आर कोड' असतो. तो स्कॅन करावा लागतो. स्कॅन केला की तुमची माहिती तात्काळ स्थानिक आरोग्य यंत्रणेकडे नोंद होते. समजा तुम्ही कोरोना बाधित असल्याचं लक्षात आलं तर तुम्हाला ट्रेस केलं जातं. तुम्ही ज्यावेळी रेस्टॉरंटमध्ये होता, तेव्हा तुमच्या आजूबाजूला बसणाऱ्या इतर ग्राहकांचाही शोध घेतला जातो. त्या रेस्टॉरंटमधून नंतर तुम्ही कुठे कुठे गेला, कोणाला भेटला हे ट्रेस केलं जातं. घरून काम करणं शक्य नसणाऱ्या लोकांना पास दिले जातात. लॉकडाऊनच्या काळात खरेदी काही किलोमीटर अंतराच्या परिघातच करावी लागते.

नियम पाळूनच लोक रस्त्यावर

आपल्या प्रमाणे या देशांमधेही कोरोना वाढला की लॉकडाऊन लागू होतो. पेशंटची संख्या कमी झाली की लॉकडाऊन शिथिल किंवा रद्द होतो. आपल्या देशात कुठेही शाळा सुरु नाहीत. पण परदेशातल्या अनेक देशात शाळा काही प्रमाणात सुरु असतात. मुळात आपल्या प्रमाणे तिथे लोक विनाकारण भटकत बसत नाहीत, पारावर, नाक्यावर चकाट्या पिटत बसत नाहीत. तिथे लॉकडाऊन संपला की आपल्यासारखी बाजारपेठेत झुंबड उडत नाही. लोक बाहेर पडतात, पण नियम पाळूनच!

अमेरिकेतल्या शहरांचं उत्तम नियोजन

लॉकडाऊन हा आपल्या हिताचा आहे, ही भावना प्रत्येक अमेरिकन नागरिकांची होती. लाचखोरी न करता पोलीस कायद्याची कडक अंमलबजावणी करतात. व्यापार उद्योग पूर्ण बंद ठेवले जातात. अमेरिकेची लोकसंख्या भारताच्या एक चतुर्थ एवढी आहे. शहरांचं नियोजन उत्तम आहे. सरकारने कोरोना स्थिती प्रभावीपणे हाताळली. इथल्या राजकारण्यांनी परस्परांवर आरोप न करता सहकार्याची भूमिका घेतली, अशी माहिती वाशिंग्टन पासून ४० मैलावर असलेल्या अशबर्न वर्जिनिया इथं नोकरीला असलेले गिरीश खरात सांगतात.

नियम गुंडाळून ठेवणारे भारतीय

भारतात गेल्यावर्षी मार्च पासून वेगवेगळ्या शहरात टप्प्याटप्प्याने लॉकडाऊन लागू झालं. आजही हे चक्र सुरूच आहे. परदेशातले लोक शिस्तप्रिय असूनही तिथं कोरोना का वाढला असा प्रश्न काही जण उपस्थित करतात. पण असले प्रश्न उपस्थित करण्यात काही अर्थ नाही. त्यापेक्षा आपण कसे वागतो, हे महत्वाचं आहे. आपल्याकडे लॉकडाऊनच्या काळातही समारंभ साजरे झाले. कोरोनाचा प्रादुर्भाव असतानाही अनेक राज्यात निवडणुका झाल्या. धार्मिक कार्यक्रम झाले. लॉकडाऊनच्या काळातही पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. सरकारी नियम तर कागदावरच राहिल्याचं दिसलं. हॉटेल सुरु झाल्यानंतर दोन टेबलांमधलं अंतर किती असावं, किती लोकांना प्रवेश द्यावा याबद्दल नियम केले. पण कोणीही नियम पाळल्याचं दिसलं नाही. मास्क कसा वापरावा अशा साध्या गोष्टी शिकवण्यासाठी जाहिरातींचा आधार घ्यावा लागला. पंतप्रधानांपासून ते अगदी मुख्यमंत्री यांच्यावर लोकांची विनवणी करण्याची वेळ आली. मुळात आपल्याकडे 'ब्रेक द चेन' चा अर्थ कुणाला समजलाच नाही, किंवा समजूनही दुर्लक्ष झाल्याचं दिसलं. त्यामुळे लॉक अनलॉकचा खेळ सुरूच राहिला. लॉक अनलॉकची ही चेन ब्रेक करायची असेल तर लोकांनीच मानावर घेतलं पाहिजे.

# शिक्षणाचा खेळखंडोबा का झाला ?

**कोरोनाच्या संकटकाळात शिक्षण क्षेत्राचा पूर्णतः खेळखंडोबा झाला आहे. विशेषतः दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांबद्दल दीर्घकाळ जी संभ्रमावस्था दिसून आली, त्यातून आपल्या शिक्षण व्यवस्थेतल्या उणिवा ठळक झाल्या. पुढची वाटचाल करताना कोरोनाची आपत्ती ही संधी मानून आपल्याला शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल करावे लागणार आहेत.**

**शिक्षणानामा**
**डॉ.अ.ल.देशमुख**

सीबीएसईपाठोपाठ राज्यातल्या महाविकास आघाडी सरकारनेही बारावीच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय नुकताच जाहीर केला आहे. दहावीच्या परीक्षाही रद्द केल्या आहेत. वास्तविक सरकारी यंत्रणांनी समाजातल्या वेगवेगळ्या घटकांना सोबत घेऊन ऑफलाईन परीक्षा घ्यायलाच हव्या होत्या, असं माझं स्पष्ट मत राहिलंय. यासाठी प्रसंगी प्रश्नांची संख्या कमी करून परीक्षेची वेळ कमी करावी. विज्ञान शाखेचा प्रायोगिक भाग परीक्षेतून वगळावा. केवळ थिअरीवर परीक्षा घ्यावी. परीक्षा टाळायचीच असेल तर विद्यार्थ्यांनी कृती संशोधन प्रकल्प सादर करावा आणि शिक्षकांनी त्यावर त्यांची ऑनलाइन तोंडी परीक्षा घ्यावी. दहावी आणि अकरावीच्या गुणांवर इयत्ता बारावीचा निकाल जाहीर करावा, असं वाटतं. दहावीची परीक्षाही रद्द केली तर या विद्यार्थ्यांचा निकाल लावताना इयत्ता सातवी, आठवी आणि नववीचे निकाल शाळांकडे आहेत. या तिन्ही निकालांवरून त्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती या संपूर्ण प्रक्रियेमधे कशी आहे याचा अंदाज लावणं अधिक योग्य ठरेल. याबद्दल राज्याचं शिक्षण खातं कोणती भूमिका घेतं हे पहावं लागेल. वास्तविक, कोरोना काळात आपल्या शिक्षण पद्धतीमधल्या सर्वच उणिवा एकदमच उघड्या पडल्याचं दिसून आलंय. अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन हा शिक्षणाचा त्रिकोण एकदमच उद्ध्वस्त झाला. सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास हे शिक्षणाचं मुख्य उद्दिष्टही उन्मळून पडलं. खडू–फळा हे एकमेव साधन, घ्या लिहून ही अध्यापन पद्धती आणि मूल्यमापनासाठी परीक्षा हे एकमेव अस्त्र हे सर्व कुचकामी ठरलं.

शिक्षणातल्या उणिवांचा अभ्यास

गेली अनेक वर्ष आपण नुसते परीक्षार्थी शिक्षण म्हणून चर्चा करत आहोत; पण त्यात मुळापासून बदल करण्यात आपण चर्चेशिवाय काहीही केलेलं नाही. आता आपल्याला संधी आली आहे किंवा निर्णय घेण्याची योग्य वेळ आली आहे. खरोखर आपल्याला शिक्षणप्रक्रियेत मुळापासूनच बदल केले पाहिजेत. नवीन शैक्षणिक धोरण नुकतंच जाहीर झालेलं आहे. अजून त्याची कार्यवाही सुरू झालेली नाही. त्यामुळे त्यात आपल्याला आवश्यक असणारे बदल किंवा सुधारणा समाविष्ट करता येऊ शकतात.

डिजिटल साक्षरतेची गरज

कोरोनाच्या काळात ऑनलाईन शिक्षण ही नवी पद्धत विकसित झाली. यापूर्वी आपल्याकडे अत्यल्प प्रमाणात आणि मर्यादित संख्येत विद्यार्थी डिजिटल प्लॅटफॉर्मचा उपयोग करत होते. पण गेल्या वर्षभरात त्याची साक्षरता थोडी अधिक वाढलेली आहे. यात काही अडचणी प्रकर्षाने पुढे आलेल्या आहेत.

त्यातली मुख्य अडचण म्हणजे सुरक्षित आणि शहरी वातावरणात वाढलेली श्रीमंतांची मुलं आणि असुरक्षित, हलाखीच्या ग्रामीण भागात वाढलेली गरिबांची मुलं असे दोन गट आपल्याला प्रकर्षाने जाणवलेत. एकसंध समर्थ भारत अशा तऱ्हेचं चित्र डोळ्यासमोर न येता अनेक विविध जाती–जमातीत विभागलेला असा भारतीय समाज आपल्या डोळ्यासमोर येतो. निरक्षर–साक्षर, ग्रामीण–शहरी, अतिशय उत्तम दर्जाचे शिक्षण मिळालेले विरुद्ध अतिशय कमी दर्जाचं शिक्षण मिळालेले अशा तऱ्हेच्या अनेक गटांमधे समाज विभागलेला आहे हे दिसून आलं. यातल्या दुसऱ्या गटातले विद्यार्थी डिजिटल साक्षरही नाहीत. त्यांना डिजिटली सक्षम करण्यासाठी शासनाने, शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. यासाठी माहिती तंत्रज्ञान ओळख आणि वापर' हा विषय बालवाडीपासून सक्तीचा केला पाहिजे.

स्वतंत्र अभ्यासक्रमही हवा

शाळेबरोबर या विषयाची जाणीवजागृती शिक्षक आणि पालकांमधे मोठ्या प्रमाणात करण्याची गरज आहे. शिक्षण क्षेत्रानेच हे काम केलं पाहिजे.



२१ व्या शतकासाठी लागणारी कौशल्यं पुढीलप्रमाणे आहेत. १) शिकायचं कसं हे शिकणं २) सतत किंवा सातत्याने शिकत राहणं. ३) बहुदिशा विचार करणं ४) समस्यांना उत्तरं शोधणं. ५) कल्पनाशक्तीचा वापर करून नव्या वाटा शोधणं ६) नेतृत्व करणं ७) प्रभावी संप्रेषण कौशल्य निर्माण करणं ८) संगणकावर प्रभुत्व असणं ९) माहिती तंत्रज्ञानात पारंगत असणे १०) तंत्रज्ञानाच्या मदतीने जलदगतीने काम करणं ११) माणूसपण राखणं, मूल्य पाळणं.

कोरोना काळात दिसून आलेल्या उणिवांचा अभ्यास केला तर आपल्याला शिक्षणात या नव्या शैक्षणिक आराखड्यानुसार म्हणजेच ५+३+३+४ या स्तरावर पुढील गोष्टींवर अधिक भर दिला गेला पाहिजे. १) डिजिटल सक्षमता २) आभासी शिक्षण ३) पायाभूत अभ्यासक्रम अर्थात फाऊंडेशन कोर्स ४) कौशल्य शिक्षण ५) मानसिकता ६) मूल्यमापन केंद्र ७) गृहशाळा या मुद्द्यांचा विस्ताराने आपण विचार करूया.

शिक्षण प्रक्रियेचा तो अविभाज्य घटक आहे. शैक्षणिक साधन म्हणून प्रत्येक शिक्षक आणि विद्यार्थ्याजवळ स्मार्टफोन, टॅब आणि लॅपटॉप असला पाहिजे. गरजू विद्यार्थ्यांना सीएसआर फंडातून ही साधनं उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थांवर टाकली पाहिजे. डिजिटल सक्षमतेचा वयोगटानुसार स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करावा. त्यात थिअरीचा भाग कमी असावा आणि शैक्षणिक ॲप, पोर्टल तयार करणं, यू ट्यूब, झूम आणि गुगल मीट, वीडियो कॉल, इन्स्टाग्राम, फेसबुक, जीपीएस या प्रात्यक्षिकांचा जास्तीत जास्त समावेश असावा. कारण पुढच्या काळात जो विद्यार्थी डिजिटल सक्षम असेल तोच टिकेल, तोच विकसित होईल आणि त्याचंच करीअर घडेल.

आभासी शिक्षणातून काय घ्यायचं?

एकविसाव्या शतकात शिक्षण ही बदलाच्या प्रक्रियेतली फार मोठी किल्ली आहे. शाळा, कॉलेज किंवा युनिवर्सिटी इथंच फक्त शिक्षण मिळतं. एवढ्यापुरता मर्यादित विचार करून चालणार नाही. शिक्षणाच्या बाबतीत खालील तीन गोष्टींमधून विचार करावा लागेल. पहिलं शिक्षण २४ तास उपलब्ध असावं. दुसरं शिक्षण कुठंही उपलब्ध असावं. आणि तिसरं म्हणजे पाठ्यक्रम व्यक्तिगत विकासानुवर्ती असावेत. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि आकलन क्षमता वेगवेगळी आहे. त्याचाही विचार आपल्याला करावा लागेल. यासाठी आपल्यासमोर वर्गाध्यापन हा एक पर्याय आहे. त्याचबरोबर आभासी शिक्षण हा दुसरा पर्यायही आहे. एकविसाव्या शतकात आपल्याला या दुसऱ्या पर्यायाचा अधिक विचार करावा लागेल. ब्लॉकचेन तंत्रज्ञान, डेटा लर्निंग आणि ॲनालिसिस, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट या गोष्टींची ओळख आणि वापर प्राथमिक, माध्यमिक, कॉलेजच्या स्तरापर्यंत करण्याची गरज आहे. आभासी शिक्षणामधून या गोष्टी आपल्याला साध्य करता येतील.

पायाभूत अभ्यासक्रमाकडे लक्ष

नवीन शैक्षणिक धोरणात ५+३+३+४ हा शैक्षणिक आराखडा मांडलेला आहे. प्रत्येक स्तर पूर्ण करून नवीन स्तर सुरू करण्यापूर्वी पूर्वीच्या संपूर्ण स्तराची उजळणी करणारे पायाभूत अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. आत्ताचं उदाहरण घ्या ना, काही मुलं यंदा एकदम दुसरीत जाणार आहेत; तर काही जण दहावीच्या वर्गात न शिकता एकदम अकरावीत प्रवेश करणार आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी पायाभूत अभ्यासक्रम कार्यान्वित करण्याची गरज आहे. नाहीतर हे विद्यार्थी पुढच्या वर्गात टिकणार नाहीत किंवा तो अभ्यासक्रम त्यांना अवघड जाईल. पायाभूत अभ्यासक्रम हा शिक्षणाचा एक प्रमुख घटक असला पाहिजे.

कौशल्य विकासाचं काय?

शिक्षणातून अपेक्षित असा वैचारिक, भावनिक, तार्किक, कौशल्यात्मक बदल घडवून येण्याची प्रक्रियाच सध्या सदोष झालीय. आज पाठ्यपुस्तकातला आशय हा शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांनाही पाठ असला की काम झालं, असं चित्र तयार झालंय. यामधून फक्त गुणांचा फुगवटा निर्माण झालेला आहे. शिक्षणातला आनंद, (क्रमशः)

# मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

## अनेक ठिकाणी गावांचा संपर्क तुटला; नदी-नाल्यांना पूर



▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुका आणि परिसरात पावसाने दमदार हजेरी लावली. काही ठिकाणी पूल वाहून गेल्याने नागरिकांचा संपर्क तुटला. तर पहिल्याच पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे बेहाल झालेले दिसत आहे.

मागील काही दिवस सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे माजलगाव मतदारसंघात लहान-मोठे तलाव तुडुंब भरून वाहत असून या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले तर वडवणी तालुक्यातील खळवट लिमगाव ते भीमनाईक तांडा जोडणारा पूल वाहून गेल्याने तांड्यासह अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तर पात्रूड येथील नदीला रविवारी पहाटेच्या पावसाने पूर येऊन अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. यावर्षी सुरुवातीपासूनच दमदार पावसाने हजेरी लावल्याने तालुक्यातील माजलगाव धरणाची पाणीपातळी वाढली आहे तर लहान, मोठे तलाव भरून वाहत आहेत. देवडी-खळवट लिमगाव गावातील नद्यांना पूर आल्याने, हरिश्चंद्र पिंप्री, चिंचवडगाव गावांचा संपर्क तुटला आहे. तर पात्रुडकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली आहे. पात्रुडच्या सरस्वती नदीला पूर आल्याने अर्धवट अवस्थेत असलेल्या पूल खचला त्यामुळे लोणगाव, देवळा, नाकलगाव, जीवनापूर, उमरी-पारगाव गावांचा संपर्क तुटला आहे. दरम्यान, या पावसामुळे शेतकरी आनंदला असून पेरणी सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे.



# सिरसाळा एमआयडीसीला मान्यता

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश

▶ प्रतिनिधी

परळी : तालुक्यातील सिरसाळा येथे प्रस्तावित एमआयडीसीला उद्योग मंत्रालयाने मान्यता दिली आहे. दरम्यान, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रयत्न करून एमआयडीसी प्रकल्पाला मंजुरी आणल्याने मतदारसंघातील नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.





सिरसाळा येथील अधिसूचित केलेल्या जमिनीवर औद्योगिक क्षेत्र-२ अंतर्गत एमआयडीसी उभारण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी उद्योग विभागाला केली होती. विधानसभा निवडणुकीनंतर झालेल्या अधिवेशनादरम्यान यासंदर्भात देसाई यांच्याशी चर्चा करून एमआयडीसी प्रस्तावित करण्यात आली होती. त्यानुसार यासाठी अधिसूचित केलेल्या जमिनीची उद्योग विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करून राज्य शासनाला याबाबतचा अहवाल सादर केला होता. त्यानुसार जमीन संपादित करण्याची प्रक्रिया उद्योग विभागामार्फत सुरू होती. धनंजय मुंडे स्वतः याबाबत सातत्याने पाठपुरावा करत होते. दरम्यान, उद्योग विभागाने मोठा निर्णय घेत सिरसाळा एमआयडीसी उभारणीच्या प्रस्तावास मान्यता दिली.

लोकनेते दिवंगत गोपीनाथराव मुंडे, दिवंगत पंडितराव मुंडे यांनी भागाचा सर्वांगीण विकास व्हावा, असे स्वप्न पाहिले होते. या भागातील सर्वसामान्य माणसाचे दरडोई उत्पन्न वाढावे, इथल्या युवकांना इथेच रोजगार मिळावा, यासाठी आपण कटिबद्ध आहोत. एमआयडीसी उभारणीच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्याने परळीच्या विकासाबाबत पाहिलेले एक मोठे स्वप्न पूर्ण होताना आनंद होत असल्याची प्रतिक्रिया धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली.

# दीपक स्वामी यांचे निधन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील लवुळ क्र.१ येथील रहिवासी दीपक दत्तात्रय स्वामी (वय ३० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने सोमवार, दि.७ जून रोजी रात्री १०:३० वाजता औरंगाबाद येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले.

दीपक स्वामी हे शिक्षक होते. ते अत्यंत शांत, संयमी, मनमिळाऊ वृत्तीचे होते. अचानक अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्यात आई, वडील, दोन भाऊ, पत्नी, एक मुलगी असा मोठा परिवार आहे. स्वामी परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

## सत्कार...जिल्हा शल्यचिकित्सकांचा!



माजलगाव : बीड जिल्हा शल्यचिकित्सकपदी डॉ.सुरेश साबळे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना जलतरण मित्र मंडळाचे अध्यक्ष जीवनराव जगताप, संपतराव हराळ, तुकाराम येवले, ॲड.इंद्रजित शिंदे, अंकुश शिंदे, सतिश सोळंके, हनुमान गवळी, डॉ.मधुकर घुबडे.

# सुर्यकांत सूर्यवंशी यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगर परिषदेतील करनिर्धारक सुर्यकांत ज्ञानोबा सूर्यवंशी (वय ४८ वर्षे) यांचे उपचारादरम्यान औरंगाबाद येथील रूग्णालयात रविवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन भाऊ व एक बहीण असा परिवार आहे.



माजलगाव नगर परिषदेमध्ये १५ वर्षांपासून ते करनिर्धारक म्हणून कार्यरत होते. लेखापाल म्हणून कार्यरत असताना नगर परिषदेतील ४ कोटी १३ लाख रूपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणात त्यांना आठ महिन्यांपूर्वी तत्कालीन नगराध्यक्ष व इतर कर्मचाऱ्यांसह अटक झाली होती. तेव्हापासून ते न्यायालयीन कोठडीत होते. दरम्यान, त्यांना अनेक आजारांनी ग्रासले होते.

माजलगाव नगर परिषद, माजलगाव

NHM

करोना विषाणू संसर्ग

काळजी करु नका...सावध रहा...

खोकला । ताप । श्वासोच्छवासात अडथळा निर्माण होणे ही लक्षणे दिसल्यास उपचार घ्या.

हे करा...स्वतःला व इतरांना सुरक्षित ठेवा...

शिंकताना व खोकताना आपल्या नाकावर व तोंडावर रुमाल धरा.

सर्दी किंवा फ्लू सदृश्य लक्षणे असलेल्या लोकांशी नजीकचा संपर्क टाळा

साबण व पाणी वापरुन आपले हात स्वच्छ धुवा.

मांस आणि अंडी पूर्णपणे शिजवून व उकडून घ्या.

जंगली अथवा पाळीव प्राण्यांशी निकटचा संपर्क टाळा.

लक्षणे आढळून आल्यास काळजी घ्या! उपचारासाठी आपल्या जवळील शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा !

राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. +91-11-23978046

राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. 020-261237394

टोल फ्री हेल्पलाईन क्र. 104 18005992699

विशाल भोसले, मुख्याधिकारी, न.प.माजलगाव

मंजूर शेख, नगराध्यक्ष, न.प.माजगाव

सौ.सुमनताई मुंडे, उपनगराध्यक्ष, न.प.माजलगाव

# मुगदिया परिवाराने जपले सामाजिक दायित्व

## ५ हजार मास्कचे केले मोफत वाटप



▶ प्रतिनिधी

माजलगाव : सामाजिक दायित्व म्हणून शहरातील कुमार ड्रेसेसचे मालक मुगदिया परिवाराकडून बाजार पेठ खुली झाल्याच्या पार्श्वभूमीवर कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांना मोफत ५ हजार मास्कचे वाटप केले.

कोरोनाची तिसरी लाट ओसरत असल्याने जिल्हा प्रशासनाने लॉकडाऊन शिथील करत गेल्या सोमवारपासून सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बाजारपेठ खुली ठेवण्यासाठी परवानगी दिली आहे. परंतू मास्क, सुरक्षित अंतर ठेवा अशा सूचना



दिल्या आहेत. त्यानुसार शहरातील कुमार ड्रेसेसकडून कोरोनाच्या प्रादुर्भावापासून बचावासाठी रिक्षा चालक, हातगाडे चालक, हॉटेल चालक, फळ विक्रेते, पादचारी नागरिक, व्यापारी यांना मोफत मास्क वाटप केले. यासाठी रोहित मुगदिया, राहुल मुगदिया, आकाश मुगदिया, रितेश मुगदिया यांनी परिश्रम घेतले.

ग्रामपंचायत कार्यालय, खानापूर
ता.माजलगाव, जि.बीड

पाणीपुरवठा कर्मचारी पाहिजे

ग्रामपंचायत कार्यालय, खानापूर अंतर्गत गावात पाणी सोडण्याकरिता पाणीपुरवठा कर्मचाऱ्याची नेमणूक करावयाची असून इच्छुक उमेदवाराने खालील शैक्षणिक कागदपत्रे घेवून खालील ठिकाणी दिलेल्या वेळेत संपर्क साधून अर्ज करावेत.

शैक्षणिक पात्रता : १० वी पास
कालावधी : दि.१५ जून ते १८ जून २०२१
स्थळ : ग्रामपंचायत कार्यालय, खानापूर, ता.माजलगाव जि.बीड

टिप : सदरिल नेमणूक तात्पुरत्या स्वरूपाची आहे याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित सरपंच | स्वाक्षरित ग्रामसेवक

ग्रामपंचायत कार्यालय, खानापूर

## उपायुक्त सुरेश बेदमुथा यांनी मंदिर, घाटाची केली पाहणी

# पुरुषोत्तमपुरीचा होणार कायापालट

▶ प्रतिनिधी

माजलगाव : भारत वर्षातील एकमेव असलेल्या व विकासापासून वंचित असलेल्या पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तम मंदीराच्या जुन्या मंदीराचे संवर्धन करून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ रूपडे पालटणार आहे. शुक्रवारी औरंगाबादचे उपायुक्त सुरेश बेदमुथा यांनी पुरुषोत्तमपुरी येथे भेट देवून चार तास पाहणी दौरा केला असून लवकरच पुरुषोत्तमपुरीचे रूपडे पलटणार आहे.

विकासापासून कोसोदूर असलेले पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तमाचे चालुक्य काळीन मंदीर संपूर्ण भारतवर्षात प्रसिध्द असून येथे पुरुषोत्तममासामध्ये राज्यभरासह परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक भेट देत असतात. महिनाभर असलेल्या या यात्रेत ५० लाखाचे आसपास भाविक येतात. मात्र येथे कुठल्याच सुखसुविधा नसल्याने भाविकांची मोठी गैरसोय होत होती. शासन दरबारी लोकप्रतिनिधी व औरंगाबाद विभागाचे आयुक्त सुनिल केंद्रेकर यांच्या प्रयत्नाने









शासनाने राज्यातील पुरातन वारसांना गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी २३ डिसेंबर २०२० ला मंत्रीमंडळात मान्यता देवून पहिल्या टप्यात १०१ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला.

त्या आंतर्गत राज्यातील आठ पुरातन तीर्थक्षेत्राचे रुप पालटणार असून यात पुरुषोत्तमपुरी येथील पुरुषोत्तमाचे मंदीर, शिवगणेश मंदीराला गतवैभव प्राप्त केले जाणार आहे. शुक्रवारी या कामाला गती देण्यासाठी औरंगाबाद विभागाचे उपायुक्त बेदमुथा यांनी शुक्रवारी पुरुषोत्तमपुरी येथे भेट देत मंदीर, गोदावरी तीरासह परीसराची पाहणी केली. यावेळी त्यांच्या सोबत महाराष्ट्र रस्ते विकास महामार्गचे अधिकारी, गटविकास अधिकारी प्रज्ञा माने, मंदीर ट्रस्टचे विजय गोळेकर, भाऊसाहेब गोळेकर, सरपंच अशोक धिरडे, पंचायत समिती सदस्य श्रीहरी मोरे, बालाजी लोखंडे आदींसह गावकरी उपस्थित होते. उपायुक्त सुरेश बेदमुथा यांनी मंदीरांची पाहणी करत भगवान पुरुषोत्तमाचे पुजन केले. यानंतर नौकेद्वारे गोदावरी पात्रातून भ्रमण करत या ठिकाणच्या घाटबांधणी बाबत नियोजन केले.

**भरीव निधीची तरतूद** : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पुरातन मंदीरांचे संवर्धन करण्यासाठी १०८ कोटींचा निधी उपलब्ध झाला असून महाराष्ट्रातील आठ पुरातन मंदीराचा विकास केला जाणार आहे. त्यात पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तमाचे मंदीर, शिवगणेश मंदीर विकास, गोदावरी घाट विकास आदी कामे होणार आहेत.

# जिल्हातील रूग्णालये कात टाकणार

## नुतन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांची माहिती

▶ प्रतिनिधी



माजलगाव : बीड जिल्हा रूग्णालयास आलेली मरगळ येत्या १५ दिवसांत दूर करून तेथील परिस्थिती पूर्व पदावर आणण्यात येईल, तसेच आगामी कोरोना तिसऱ्या लाटेचा संभावित धोका पाहता लहान मुलांसाठी जिल्ह्यात सर्व तालुक्यांच्या ठिकाणी मिळून ५६० खाटांचे नियोजन करण्यात येत असल्याचे प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांनी सांगितले. दरम्यान, जिल्ह्यातील रूग्णालये कात टाकणार असून त्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.



माजलगाव ग्रामीण रूग्णालयाचा डॉ.साबळे यांनी शनिवारी पदभार डॉ.गजानन रुद्रवार यांच्याकडे सोपविल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते पुढे म्हणाले की, बीड जिल्हा रूग्णालयात बहुतांश काम हे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांवरच सुरू असल्याचे आपल्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे येथील कायमस्वरूपी असलेले सर्जन, डॉक्टर्स, फिजिशियनची बैठक घेऊन कामात कुचराई चालणार नसल्याचे त्यांना बजावले आहे. दररोज सकाळी आठ वाजता राऊंड करून प्रत्येक रूग्णाची पाच मिनिटे तपासणी व रूग्णांना औषधींची नोटिंग केलीच पाहिजे. त्यानंतर ते १२.३० या वेळेत ओपीडीत रूग्णांना सेवा मिळाली पाहिजे अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. रूग्णालयात असलेल्या कायमस्वरूपी व कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांकडून रूग्णालय व परिसरात स्वच्छता सुरूच आहे. जिल्ह्यात असलेल्या बोगस डॉक्टरांवरदेखील लवकरच कारवाई करण्यात येईल, असे सांगून कोविडमुळे ग्रामीण भागातील थांबलेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, महिलांचे बाळंतपण, सिझेरियन देखील लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून पदभार घेतल्याबद्दल डॉ.श्रेयस देशपांडे, डॉ.भारत वाघमोडे, डॉ.धर्मेंद्र भोपळे, डॉ.कैलास नरवडे, डॉ.मुंदडा, डॉ.प्रविण वारकरी, डॉ.गजानन रुद्रवार, डॉ.किशोर रत्नपारखी, डॉ.सत्येंद्र दबडगावकर, तसेच ग्रामीण रूग्णालय कर्मचाऱ्यांनी डॉ.साबळे यांचा सत्कार केला.

## युवासेनेचा गोरगरीबांना मदतीचा हात



माजलगाव : पर्यावरण मंत्री युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या आदेशानुसार माजलगाव युवासेनेकडून गोरगरीबांना अन्नदान करण्यात आले. तसेच गरजूंना चप्पलचे जोड वाटप करताना युवासेना तालुकाप्रमुख बाळासाहेब मेंडके, अण्णासाहेब साखरे, गोविंद काळे, सतिश थोरात, विक्की डोंगरे, शाम भुजंगे, ताहेर शेख, प्रतीक मिटकरी, ईश्वर धोपटे आदी.

## सोनीमोहाचे सरपंच विष्णू अडागळे यांचे निधन

▶ प्रतिनिधी



धारूर : तालुक्यातील सोनीमोहा येथील सरपंच विष्णू अडागळे (वय ४६ वर्षे) यांचे कोरोनाने निधन झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. सरपंच विष्णू अडागळे यांना गेल्या महिन्यात कोरोनाची बाधा झाली होती. जवळपास एक महिना धारूर येथील खाजगी रूग्णालयात उपचारानंतर प्रकृती अस्वास्थ्यामुळे अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. विष्णू अडागळे हे गेल्या तीन वर्षापासून सोनीमोहा येथील सरपंच आहेत. त्यांच्या पाश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सोनीमोहा सह पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.



# आशावर्कर व गटप्रवर्तक यांचे कामबंद आंदोलन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : कोविड-१९ या विषाणूने संपूर्ण जगात गेल्या वर्षभरापासून थैमान घातले आहे. ही साथ आटोक्यात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने खूप मोठेपर्यंत केले आहेत. या जीवघेण्या साथीमध्ये शासनाच्या आदेशानुसार राज्यातील आशा व गटप्रवर्तक यांनी काम केलेले आहे. तेव्हा त्यांच्या विविध मागण्यांसाठी दि.१५ जूनपासून संप करण्यात येणार असल्याची माहिती शिवाजी कुरे यांनी दिली.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यात कोविड-१९ चा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी व मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाने कडक निर्बंध लागू करून सार्वत्रिक लसीकरणाची मोहीम हाती घेतली आहे. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने जी मोहीम हाती घेतली आहे. त्या कामांमध्ये आशा स्वयंसेविका यांचा व गटप्रवर्तक यांचा सक्तीने समावेश करण्यात आला आहे. त्यात अशांनी घरोघरी जाऊन विविध प्रकारच्या तपासण्या करून सर्वेक्षण करणे त्यांचे रेकॉर्ड ठेवणे. कोरोना लसीकरण अंतर्गत कॅम्पमध्ये हजर राहून कामे करणे. इत्यादी जबाबदाऱ्या आशा स्वयंसेविकावर सोपविण्यात आले आहेत. तसेच या व्यतिरिक्त त्यांना नियमित नेमून दिलेल्या ७२ पेक्षा जास्त कामे करावी लागतात. सदर कामाचा बोजा आशा व गटप्रवर्तक कवर टाकल्यामुळे त्यांच्यावर शारीरिक ताण येत आहे. त्याचे मानसिक संतुलन बिघडत आहे. मार्च २०१९ पासून ग्रामीण व शहरी भागात आशा व गटप्रवर्तक यांची प्राथमिक आरोग्य केंद्र लसीकरण केंद्र कॅम्प येथे सकाळपासून संध्याकाळपर्यंत आठ तासाची ड्युटी लावण्यात आले आहे. काही ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊन अशांना कोरोना संशयित व्यक्तीची टेस्ट करावी लागते. दैनंदिन लसीकरणाचे आढावा पासून शासनाच्या सर्व योजनांचा तसेच आशा यांनी केलेल्या सर्व च्या कामाचा दैनंदिन आढावा गट प्रवर्तकांना सादर करावा लागतो. परंतु त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र व कॅम्प मध्ये आठ ते नऊ तास काम करावे लागते. त्यामुळे त्यांच्यावर कामाचा अत्यंत बोजा पडत आहे.

### या आहेत प्रमुख मागण्या

आशा व गटप्रवर्तक यांना सुट्टीच्या दिवशी काम सांगू नये, आशा व गटप्रवर्तक यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, दोन व तीन हजारांचे अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी, कोविडच्या कामाची सक्ती करू नये, समान कामाला समान मोबदला देण्यात यावा माझे कुटुंब माझी जबाबदारी या मोहिमेचा दुसऱ्या टप्प्याचा मोबदला आशा व गटप्रवर्तक पूर्णतः देण्यात यावा, अशा मागण्यांचे निवेदन माजलगाव तालुका आरोग्य अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी उर्मिला शेंडगे, उषा असे, शोभा ढगे, ज्योती ढगे, मीरा सुरवसे, इत्यादी उपस्थित होते.

# राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराला प्रतिसाद



▶ प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेल्या रक्तदान शिबिराला माजलगावात प्रतिसाद मिळाला. दरम्यान, ४१ रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

माजलगाव शहरातील माँ वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला जगदिश साखरे, पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पोलीस राज ससाणे, मनसेचे बीड जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे, राजेंद्र मोटे, मनसे वृत्तांतचे मारुती दुनगे, गणेश वाघमारे महिला जिल्हाध्यक्ष रेखा अंबुरे, शकुंतला घुंगासे, पत्रकार तुकाराम येवले, उमेश मोगरकर ज्योतीराम पांढरपोटे, अमर साळवे, उत्तमराव जाधव, बाळासाहेब फपाळ, अविनाश जाधव मधुर रुद्रवार, भगीरथ तोडकरी आदींची उपस्थिती होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मनसे माजलगाव शाखेच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. जागतिक रक्तदान दिनाच्या दिवशी १४ जून रोजी घेतलेल्या रक्तदान शिबिरात समाजातील विविध घटकांनी सहभाग नोंदविला.

शिबीर यशस्वी करण्यासाठी मनसे विद्यार्थी आघाडीचे तालुका उपाध्यक्ष गोविंद देशमाने, तुकाराम कळसाईतकर, रमेश जोगडे, अरविंद जाधव स्वानंद नाईक, दीपक तोडकरी, निखिल धोपटे, कृष्णा मालपाणी, योगेश राजमाने शंतनु डहाळे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी पोलीस बॉईज संघटनेचे तालुकाध्यक्ष तुकाराम कळसाईतकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. रक्तदान शिबिरा बरोबरच वृक्षारोपणही करण्यात आले.



आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.